THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

'' प्रेस नोट '' **दि. १०/०१/२०२६**

गुन्हे शाखा, ठाणे शहर चे मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाची कामगिरी

'' पत्नीचा खून करून ०८ महिन्यापासून पसार असलेल्या आरोपीतास नाशिक मधुन केले जेरबंद ''

दिनांक ०९/०५/२०२५ रोजी २०:१५ वा चे सुमारास मंडलिक चाळ, गावडे शाळेजवळ, उल्हासनगर ०३ या ठिकाणी मयत सुरेखा आनंद सुर्यवंशी वय-४७ वर्ष रा. मंडलिक चाळ, गावडे शाळेजवळ, उल्हासनगर ०३ हिचे पती आरोपी आनंद तुळशीराम सुर्यवंशी, वय-६० वर्ष हा त्याच्या आईचे नावावर असलेली डोंबिवली येथील रूम ही त्यांचा भाऊ नामे रतन सुर्यवशी यांच्या नावावर करणार होते त्याबाबत मयत सुरेखा आनंद सुर्यवंशी हीने आरोपी यास जाब विचारला या कारणाचा आरोपीतास राग येवुन त्याने मयत हिचे गळयावर धारदार हत्याराने वार करून तीला जिवे ठार मारले म्हणुन मध्यवर्ती पोलीस ठाणे येथे गुरनं. ३५८/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१) प्रमाणे दिनांक १०/०५/२०२५ रोजी ०४:०३ वा.दाखल आहे.

नमुद गुन्हयातील आरोपीत आनंद तुळशीराम सुर्यवंशी वय-६० वर्ष हा गुन्हा केल्यापासून अटक टाळण्यासाठी आपले अस्तित्व लपवून वेगवेगळया ठिकाणी राहत होता. सदर आरोपीताचा शोध घेवून त्यास अटक करणेबाबत मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांनी आदेशीत केले होते. त्याप्रमाणे मा.वरिष्ठांचे मार्गदर्शन व सुचना प्रमाणे मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाचे एक विशेष पथक तयार करून मा.वरिष्ठांची परवानगी घेवुन नमुद आरोपीताचा जळगांव, नाशिक, आहिल्यानगर या जिल्हयामध्ये कसोशीने शोध तपास सुरू होता. नमुद आरोपी हा मोबाईल वापरत नसल्याने त्याचा शोध घेणे हे पोलीस पथकास मोठे आव्हान होते.

सदर आरोपीताचा शोध सुरू असतांना दिनांक ०९/०१/२०२६ रोजी मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाचे पोउपनि/सुरेश माळोदे व पोहवा/१६०२ पाटील यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, नमुद गुन्हयातील आरोपीत हा विहितगाव, नाशिकरोड, नाशिक येथे येणार आहे. त्याप्रमाणे पोलीस पथक नाशिक रोड येथे रवाना केले. पोलीस पथकाने विहितगाव, नाशिकरोड, नाशिक येथे मिळालेल्या बातमी प्रमाणे सापळा लावुन पाळत ठेवली असता नमुद गुन्हयातील आरोपी नामे आनंद तुळशीराम सुर्यवंशी वय-६० वर्ष, हा बुध्दविहार जवळ विहीतगाव येथे आला असता त्यास पोलीस पथकाने शिताफीने ताब्यात घेवून नमुद गुन्हयाचे पुढील कायेदशीर कार्यवाही करीता मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर येथे हजर केले असता त्यास नमुद गुन्हयात अटक करून मा. प्रथम वर्ग सह दिवाणी न्यायालय, उल्हासनगर या न्यायालयात हजर केले असता त्याची दिनांक १४/०१/२०२६ रोजी पावेतो पोलीस कस्टडी मंजूर करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मध्यवर्ती पोलीस स्टेशन, उल्हासनगर करीत आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अमरसिंह जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. विनय घोरपडे (शोध-२) यांच्या अधिपत्याखाली मध्यवर्ती गुन्हे शोध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयकुमार देशमुख यांच्या सुचना व मार्गदर्शनाने पोउपनि/ सुरेश माळोदे, पोहवा/दादासाहेब पाटील, पोना/ दिनकर सांवत, पोना/अंकुश शिंदे, पोशि/मयुर शिरसाट व चापोशि/विकास चेमटे पथकाने केली आहे.